# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स – २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक/महत्वाचे

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2018/ 9069
दिनांक: 30 AUG 2018

विषय:- शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील प्रथम वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी / प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका फार्मसी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी, एचएमसीटी व थेट व्दितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमात प्रवेशित उमेदवारांचे विहित मुदतीतील नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत...

संदर्भ:- 1. या संचालनालयाचे पत्र क्रमांक 2अ/एडीएम/2018/848 दि. 02.07.2018
2. या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक 10/एडीएम/पदविका/201/1043 दि. 24.08.2018.
3. या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक 10/एडीएम/पदविका/201/1044 दि. 24.08.2018.

उपरोक्त विषयास अनुसरुन नमुद करण्यात येते की, संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता प्रथम वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी / प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका फार्मसी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी, एचएमसीटी व थेट व्दितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरिता खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे प्रवेशित विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करणेबाबत अंतिम तारीख निश्चित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|
| 1 | थेट व्दितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी | 23.08.2018 |
| 2 | प्रथम वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी | 25.08.2018 |
| 3 | प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका फार्मसी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी, एच.एम.सी.टी. | 26.08.2018 |

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की –

1. ज्या विद्यार्थ्यांनी वर नमुद अंतिम दिनांकापर्यंत संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र प्राप्त केले असुन काही तांत्रिक कारणास्तव संस्थेमार्फत या संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केले नाहीत, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येऊ नयेत.
2. ज्या विद्यार्थ्यांनी संबंधित मागासवर्गीय प्रवर्गातुन अर्ज सादर केला होता व त्यांना गुणवत्तेने General Open/ TFWS/Defence/Minority seat/ PWD seat या जागेवर प्रवेश मिळाला परंतु, वर नमुद अंतिम दिनांकापर्यंत संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र विद्यार्थ्यांने सादर केले नाही, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश संबंधित संस्थेने कॅटेगरी कन्व्हेशन फी रक्कम रु. 100/- (रक्कम रु. शंभर फक्त) आकारुन खुल्या प्रवर्गामध्ये बदल करण्यात यावा व तसे संबंधित विद्यार्थ्यांस लेखी निदर्शनास आणावे.

3. तसेच वर नमुद अंतिम दिनांकानंतरचे संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी सादर केले असल्यास, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशाबाबत संदर्भिय परिपत्रक क्रमांक 2 व 3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे संस्थेने तात्काळ कार्यवाही करावी.

तसेच वर नमुद प्रवेशाबाबत संस्थेने विहित कालावधीत कार्यवाही केली नाही तर होणाऱ्या पुढील परिणामास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, यांची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

---

पृष्ठांकन क्रं./तंशिस/विकाना/शैवि/पदविका/२०१८/2884
दिनांक:- 31 AUG 2018

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदविका संस्था नागपूर विभाग,
नागपूर.

उपरोक्त पत्रात नमुद केल्याप्रमाणे नागपूर विभागातील पदविका संस्थानी दिलेल्या सुचनांचे काटेकोरप्रमाणे पालन करुन, सदर परिपत्रक संस्थेच्या सूचनाफलकावर दर्शनी भागावर प्रसिध्द करण्यात यावे.

(मुल्लाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

E:\letters\cap 2010-11\notification regarding cap 2017-18.doc

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१८/ ८४८
दिनांक : - 2 JUL 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर

**विषय** :- केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया २०१८-१९
नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्राबाबत....

संदर्भ : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक राज्यसीईटी कक्ष / प्रवेश प्रक्रिया / नॉन क्रिमिलेअर/ ९५०/२०१८, दिनांक ३०.६.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी शासनाच्या दिनांक २४.६.२०१८ रोजीच्या अध्यादेशास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता दिनांक २९.६.२०१८ रोजीच्या प्राधिकरणाच्या बैठकीतील निर्णयानुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठीचे वेळापत्रकातील दिनांक हे जात वैधता प्रमाणपत्राप्रमाणेच नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्रासाठी देखील लागू राहतील असे संदर्भाधीन पत्रान्वये संचालनालयास कळविले आहे.

त्यानुसार ही बाब आपल्या अधिनस्त सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावी व त्यानुसार आपल्या विभागातील सर्व सुविधा केंद्र आणि प्रवेश निश्चिती केंद्रांनाही कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात यावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी सादर

प्रत : कार्यासन क्रमांक ३,(माहिती तंत्रज्ञान कक्ष),मुख्य कार्यालय,मुंबई यांना संकेतस्थळावर प्रसिध्दी आणि पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

E:\Budage\2018-19\General Correspondence\NCL submission extended time table.docx

GOVT. OF MAHARASHTRA

# STATE CET CELL, MUMBAI

## Schedule of Activities for Admission to first Year of Under Graduate Professional Courses for AY 2018-19

Name of the Director - TECHNICAL EDUCATION

| Sr. no. | Name of the Course | Last Date of Registration | Display of Provisional Merit List | Last date for Submission of Grievances | Display of Final Merit List | Last date for Reporting to alloted institute and submission of Original Documents | | | Last date for Submission of Non Creamy Layer Certificate of Candidate (Course wise) | Special round for Admission of Vacancy due to Non submission of Non Creamy Layer Certificate * | Cut off date of admission |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | CAP I | CAP II | CAP III | | | |
| 1 | BE/B.Tech | 19-06-2018 | 21-06-2018 | 23-06-2018 | 24-06-2018 | 22-07-2018 | 22-07-2018 | 22-07-2018 | 10-08-2018 | 10-08-2018 to 14-08-2018 | 14-08-2018 |
| 2 | B.Pharmacy/Pharm.D | 19-06-2018 | 20-06-2018 | 22-06-2018 | 23-06-2018 | 20-07-2018 | 20-07-2018 | 20-07-2018 | 10-08-2018 | 10-08-2018 to 14-08-2018 | 14-08-2018 |
| 3 | B.Arch | 20-06-2018 | 22-06-2018 | 24-06-2018 | 25-06-2018 | 19-07-2018 | 19-07-2018 | 19-07-2018 | 10-08-2018 | 10-08-2018 to 14-08-2018 | 14-08-2018 |
| 4 | B.HMCT | 23-06-2018 | 24-06-2018 | 26-06-2018 | 27-06-2018 | 22-07-2018 | 22-07-2018 | 22-07-2018 | 10-08-2018 | 10-08-2018 to 14-08-2018 | 14-08-2018 |
| 5 | MBA/MMS | 28-06-2018 | 29-06-2018 | 01-07-2018 | 02-07-2018 | 26-07-2018 | 26-07-2018 | 26-07-2018 | 10-08-2018 | 10-08-2018 to 14-08-2018 | 14-08-2018 |
| 6 | MCA | 12-07-2018 | 13-07-2018 | 15-07-2018 | 17-07-2018 | 11-08-2018 | 11-08-2018 | 11-08-2018 | 19-08-2018 | 19-08-2018 to 25-08-2018 | 25-08-2018 |
| 7 | ME/M.Tech | | | | | | | | 27-08-2018 | | |
| 8 | M.Pharm | | | | | | | | 27-08-2018 | | |
| 9 | M.Arch | | | | | | | | 19-08-2018 | | |
| 10 | M.HMCT | | | | | | | | 19-08-2018 | | |
| 11 | DSE | | | | | | | | 30-08-2018 | | |
| 12 | DSP | | | | | | | | 30-08-2018 | | |
| 13 | Post SSC Diploma | 16-07-2018 | 17-07-2018 | 20-07-2018 | 21-07-2018 | 19-08-2018 | 19-08-2018 | 19-08-2018 | 25-08-2018 | 25-08-2018 to 28-08-2018 | 28-08-2018 |
| 14 | Post HSC Diploma | 17-07-2018 | 18-07-2018 | 21-07-2018 | 22-07-2018 | 20-08-2018 | 20-08-2018 | 20-08-2018 | 26-08-2018 | 26-08-2018 to 28-08-2018 | 28-08-2018 |
| 15 | Direct Second Year Diploma | 12-07-2018 | 13-07-2018 | 16-07-2018 | 17-07-2018 | 17-08-2018 | 17-08-2018 | 17-08-2018 | 23-08-2018 | 23-08-2018 to 28-08-2018 | 28-08-2018 |

* - This round shall be conducted at Institute Level

NOTE -Notifications for sr.no 7 to 12 not yet published

Exam Co- ordinator

Director /Nodal Officer

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक /अत्यंत महत्वाचे
कालमर्यादा

क्रमांक: १०/एडीएम/पदविका/२०१८/ १०६३
दिनांक : 24 AUG 2018

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित उमेदवारांचे नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र Upload करण्याबाबत...

संदर्भ :- या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/२०१८/८४८ दिनांक ०२.०७.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, संचालनालयाच्या संदर्भाधिन परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठीचा सुधारीत दिनांक निर्धारीत करण्यात आलेला आहे.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारा प्रवेशित राखीव प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर न करता केवळ याबाबतच्या यंत्रणेकडे सादर केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारे प्रवेश निश्चित केलेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी संदर्भाधिन परिपत्रकान्वये निर्धारीत केलेल्या दिनांकापर्यंत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र प्रवेशित संस्थेतर्फे ऑनलाईन अपलोड करणे अत्यावश्यक होते.

विहीत केलेल्या दिनांकापर्यंत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर न केलेल्या अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येणार आहे. ही बाब विचारात घेऊन विद्यार्थ्याने विहीत मुदतीत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र संस्थेस सादर करूनही जर संस्थेने ते संदर्भिय परिपत्रक क्रमांक १ अन्वये निर्धारीत केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत अपलोड न केल्यास उद्भवणा-या प्रकरणांना संबंधित संस्था जबाबदार राहील, याची थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर
२. माहिती तंत्रज्ञान कक्ष, कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय,मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

C:\Users\desk10\Desktop\Validity Upload within time limit circular.docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक /अत्यंत महत्वाचे
कालमर्यादा

क्रमांक: १०/एडीएम/पदविका/२०१८/ १०४४
दिनांक : 24 AUG 2018

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित उमेदवारांचे नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र Upload करण्याबाबत...

संदर्भ :- या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २३/एडीएम/२०१८/८४८ दिनांक ०२.०७.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, संचालनालयाच्या संदर्भाधिन परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठीचा सुधारीत दिनांक निर्धारीत करण्यात आलेला आहे.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारा प्रवेशित राखीव प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर न करता केवळ याबाबतच्या यंत्रणेकडे सादर केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारे प्रवेश निश्चित केलेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी संदर्भाधिन परिपत्रकान्वये निर्धारीत केलेल्या दिनांकापर्यंत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र प्रवेशित संस्थेतर्फे ऑनलाईन अपलोड करणे अत्यावश्यक आहे.

संदर्भाधिन परिपत्रकान्वये निर्धारीत केलेल्या दिनांकापर्यंत वरीलप्रमाणे यंत्रणेकडे सादर केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारे ज्या राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित केलेले असतील अशा प्रकरणी संबंधित संस्थानी त्या विद्यार्थ्यांचे नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र संकेतस्थळावर तात्काळ अपलोड करावे. विहीत केलेल्या दिनांकापर्यंत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येईल. ही बाब विचारात घेऊन विद्यार्थ्यांने विहीत मुदतीत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र संस्थेस सादर करूनही जर संस्थेने ते संदर्भिय परिपत्रक क्रमांक १ अन्वये अपलोड करावयाच्या अंतिम दिनांकापर्यंत अपलोड न केल्यास उद्भवणा-या प्रकरणांना संबंधित संस्था जबाबदार राहील, याची प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर

२. माहिती तंत्रज्ञान कक्ष, कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय,मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. तसेच त्यांना कळविण्यात येते की, संबंधित विद्यार्थ्यांनी सदर प्रमाणपत्र तात्काळ संस्थेमार्फत अपलोड करण्याबाबत SMS संदेश विद्यार्थ्यांना पाठविण्याची कार्यवाही करावी.